ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# अर्थव्यवस्थेतील महिला उद्योजिकांची भूमिका

डॉ. भारती सुदर्शन गोस्वामी
सहायक प्राध्यापक
श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांशः**

उद्योजक म्हटले की पुरूषाची प्रतिमा डोळयापुढे येते. परंतू उद्योजक म्हणून महिलांची प्रतिमा समोर आणण्याचा प्रयत्न या आधारे करण्यात येत आहे. भारतीय अर्थ व्यवस्थेतील एक विकासाचा भाग उद्योगाद्वारे पूर्ण केला जातो. त्यामुळे या उद्योगात महिलांचा शिरकाव करून त्यांच्या क्षमतांचा, उपजत शक्तीचा व गुणांचा उपयोग उद्योग व व्यवसाय क्षेत्रात होणे अत्यंत महत्वाची बाब आहे. याकरिता प्रस्तूत लेख हा अर्थव्यवस्थेतील उद्योजक महिलांची भूमिका दर्शविणारा आहे. यात महिला उद्योजिकांची माहिती दर्शक तक्ता घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे महिला उद्योजकांची कार्ये व भूमिका, महिला उद्योजक संघटनांची भूमिका, महिला उद्योजक संघटना, महिला आर्थिक विकास महामंडळ, महिला नागरी सहकारी बॅंका त्याच बरोबर महिला उद्योजकांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, याविषयी विचार मिळालेल्या माहितीच्या आधारे मांडण्यात आलेले आहेत. महिला सक्षमीकरण करणे काळाची गरज आहे. त्यामुळे आर्थिक सुत्रे महिलांनी हाती घ्याची म्हणून महिलांना संधी देणे, अधिकार देणे, प्रोत्साहन करणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्था विकसित करण्या करिता आवश्यक बाब महिला उद्योजक निर्माण करणे.

**प्रस्तावनाः**

भारताची अर्थव्यवस्था ही अनेक घटकांवर आधारित असते. या घटकांमध्ये प्रमुख घटक देशाचा आर्थिक विकास हा असतो. त्यामुळे आर्थिक विकास हा निकष मानून संपूर्ण जगाचे विभाजन विकसित आणि विकसनशील देश असे करण्यात येते. विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्न आणि उत्पादकता यात वाढ, उत्पन्नाचे सामाजिक न्यायाने वाटप आणि सांस्कृतिक दृष्टया नविन प्रतिमा तयार करणे यांचा समावेश होतो. आर्थिक विकास करतांना केंद्रबिंदू म्हणून 'मानव' आहे. दूरदृष्टी, पुढाकार वृत्ती आणि व्यावसायिक विद्वत्ता असणारी माणसे संधी शोधून त्या संधीचा योग्यप्रकारे उपयोग करतात व संधीचे सोने करतात. असा दृष्टिकोन ठेवणारे व्यक्ति उद्योजकाच्या भूमिकेत समोर येतात. हे उद्योजक आर्थिक विकासात महत्वपुर्ण मानले जातात. कारण उद्योजकता हा समाजामधील एकमेव उत्पादक घटक आहे. उद्योजक जगातील विचार केल्यास असे आढळून येते की, भारतात पुरूषप्रधान संस्कृती आहे. हाच वसा उद्योजक जगात सुद्धा आपल्याला पाहावयास मिळेल. भारतीय कुटूंब व्यवस्थेचा पाया असलेली भारतीय महिला आपल्याला उद्योजकांमध्ये कमी प्रमाणात दिसून येईल. जवळपास देशात व राज्यात याचे प्रमाण फक्त ९ टक्के इतके अल्प आहे.महिला धोरणांच्या प्रभावीपणे अंमल बजावणीतून महिला उद्योजकांचे प्रमाण ९ टक्क्याहून २० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट आगामी सरकारने ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य नाही. याकरिता महिलांना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टिने शासनाने प्रयत्नशील असावे, असे वाटते. ज्या महिला उद्योजिका स्वतः बरोबर दुसऱ्यांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. रोजगाराने उत्पन्नाचे साधन वाढण्यास मदत होते. आर्थिक विकास प्रक्रियेत हीच उत्पन्न व उत्पादकता महत्वाची भूमिका पार पाडणे म्हणजे या उत्पन्न व उत्पादकतेची गणना देशाच्या अर्थव्यवस्थेला विकसित करण्याकरिता हातभार लावणे होय. महिलांमध्ये उपजतच काही गुणवैशिष्टे असतात. जसे- सहन शीलता, सातत्य, चिकाटी, जिद्द, एकाग्रता,

व्यवहार कुशलता, लवचिकता, कणव व निर्णय अचुकता. महिलांमध्ये असलेल्या या गुणांच्या आधारे महिला उद्योजिका म्हणून नवीन उद्योग सुरू करण्याच्या दृष्टिने संभाव्य संधीचा शोध घेणे, जोखीम स्विकारणे व आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जाणे, नव निर्मिती करणे, समन्वय साधणे, प्रशासन कार्य करणे, नियंत्रण ठेवणे व दैनंदिन देखरेख करणे इत्यादी कार्ये आणि भूमिका महिला उद्योजिका यशस्वीपणे पार पाडू शकते.

**विषयातील मुख्य विचार :**

महिला उद्योजकता, कार्ये व भूमिका, संघटना, महिला विकास कार्ये, महिला उद्योजक अडचणी

**महिला उद्योजकताः**

महिला उद्योजक म्हणजे जी महिला अथवा महिलांचा समूह उद्योग व्यवसाय सुरू करण्याकरिता पुढाकार घेते, सर्वांना संघटीत करते आणि व्यवसाय चालविते हा सर्व सामान्य अर्थ आहे. भारत सरकारने महिला उद्योजकाचा अर्थ सांगतांना म्हटलेले आहे की, ज्या उद्योग व्यवसायात किमान ५१ टक्के कर्मचारी ह्या महिला आहेत त्या व्यवसायाला महिला उद्योजक म्हणावे.

महिला उद्योजकाची संख्या आज आपल्याला अत्यंत कमी दिसून येते. परंतू ही संख्या वाढविण्याकरिता शासन अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहे. महिलांनी पूढे येवून व्यवसाय उद्योग करावा याकरिता धोरणे तयार करण्यात आलेली आहेत. महिलांच्या क्षमतांचा उपयोग व्यवसाय उद्योगात व्हावा याकरिता महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्र शासनाने २०१७ या वर्षी विशेष धोरण जाहिर केलेले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये जनजागृती करणे व त्यांना प्रोत्साहन देवून भावी यशस्वी उद्योजिका तयार करणे हा आहे.

नविन उद्योजकांना उद्योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी १ ऑक्टोबर, १९८८ रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र म्हणजेच एम. सी. ई. डी. ची स्थापना केली. या केंद्राची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे सुशिक्षित युवक व युवतींमध्ये उद्योगाचे वातावरण निर्माण करणे. याचा प्रसार व प्रचार करणे, उद्योगाची माहिती पोहचविणे हा आहे. या केंद्राने कार्य करतांना अनेक प्रकारचे पुरस्कृत व अपुरस्कृत उपक्रम हाती घेतले.

'महिला धोरण' शासन राबवित असतांना महिला उद्योजकता विकास शिवीरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, उद्योजकता विकास कार्यक्रम अशा अनेक माध्यमाच्या साहाय्याने या धोरणाचा प्रचार व प्रसार करण्याची जवाबदारी एम. सी. ई. डी. या संस्थेकडे सोपविलेली आहे. याद्वारे महिला सक्षमीकरणाचे कार्य सुरू आहे.

**महिला उद्योजकांची माहितीः**

भारतातील यशस्वी महिला उद्योजिकांची माहिती आपणास व्हावी याकरिता माहिती दर्शक तक्ता देण्यात आलेला आहे. याचे कारण की, प्रेरणा देणे किंवा प्रेरणा घेणे हे आपणासमोर जे प्रस्तुत केले जाते त्यावर अवलंबून असते. यशस्वी महिलांची माहिती आपणास प्रेरणा देणारी ठरणार असे वाटते. भारतातील दहा यशस्वी महिला उद्योजिका पुढीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र. | महिला उद्योजकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| 1 | Indu Jain | Chairperson, Largest Media Group, Bennett Coleman & Co. Ltd. |
| 2 | Kiran Majumdar Shaw | Founder Chairperson and Managing Director of Biocon Limited |
| 3 | Indra Nooji | CFO and President Pepsi Co. ULCC |
| 4 | Vandana Luthra | Gulf Cooperation Council (Beauty and wellness) |
| 5 | Naina Lal Kidwai | Vice Chairman, JM Morgan Stanley |
| 6 | Chanda Kochar | MD & CEO ICICI Bank |
| 7 | Ekta Kapoor | Founder Balaji Telefilms Television Industry |
| 8 | Suchi Mukharji | Limeroad Ex-ebay Skype and Gumtree |
| 9 | Richa Kar | Founder, Online Lingeri Store Zivame |
| 10 | Aditi Gupta | Co- founded Menstupedia |

वरील यशस्वी महिला उद्योजकांव्यतिरीक्त महाराष्ट्रातील काही भागातील प्रारूप बघितले असता असे आढळून येते की, त्या भागातील ५ महिला उद्योजिका शेतातील पिकं कापणी करणे या कार्यात यशस्वी शिखरावर पोहोचलेल्या आहेत ते पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| NGO Swayam Shikshan Prayog Organic Vegitables | - Shailaja Narode |
| Organic Farming | - Archana Mane |
| Glass Bangles Manufact | - Kamal Kumbha |
| Organic Farming | - Revathi Kangule |
| Grape Nursery | - Shilp Vibuthe |

या व्यतिरीक्त कल्पना सरोज भारतीय उद्योजिका यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. त्या कामिनी टयूब्स्, मुंबई च्या संचालिका आहेत. यांनी शून्यातून विश्व निर्माण केलेले आहे. त्यांचे हे यश सर्व उद्योजिकांकरिता उल्लेखनीय आहे.

**महिला उद्योजकांची कार्ये व संघटनांची भूमिका :**

उद्योग व व्यवसाय म्हटला की, त्याचा विकास करण्यासाठी अनेक कार्ये पार पाडावी लागतात. पुरूष उद्योजकांप्रमाणेच महिला उद्योजकांनाही कार्ये करावी लागतात. त्यात नविन उद्योग सुरू करण्याच्या दृष्टिने संभाव्य संधीचा शोध घेणे, जोखिम स्विकारणे, अनिश्‍चिततेला सामोरे जाणे, नवनिर्मिती करणे, समन्वय प्रस्थापित करणे, प्रशासन व नियंत्रण करणे आणि दैनंदिन कार्यावर देखरेख ठेवणे इत्यादी कार्यांना पार पाडीत असतांना महिला उद्योजक आपल्या क्षमता व गुणवैशिष्टांचा उपयोग करीत असते. ह्या सर्व भूमिका पार पाडत असतांना सोबतच नियोजन, व्यवहार, आर्थिक अंदाजपत्रक, संवाद कौशल्य, सामंजस्य अशा उद्योजकीय गुणांची साथ असते. उणीवांवर मात करून स्वतःच्या पायावर उभे राहिल्यामुळे एक वेगळे बळ मिळते. यशस्वी उद्योजक होण्याकरिता स्त्रियांनी आपल्या सुप्त गुणांना पारखून जास्तीत जास्त व्यवसायाकडे वळायला हवे.

गरज ही शोधाची जननी आहे, असे म्हटले जाते. याच गरजेतून महिला गृहिणी, गृहउद्योग, कर्तबगार उद्योजकीय, उद्योगिनी महिला अशी बदलत जाते. पण महिला ते उद्योजिका हा वेग मंद आहे. याला चालना देण्यासाठी काही महिला उद्योजक संघटना आपली भूमिका पार पाडतात. महिला उद्योजकता विकासासाठी राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला उद्योजक संघटनांची स्थापना झालेली आहे. या संघटनांचा प्रमुख हेतू ग्रामीण तसेच शहरी भागातून महिला उद्योजकतेच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण व्हावे हा आहे. याकरिता त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विकास कार्यक्रमाचे आयोजन करणे, विविध सवलती अनुदाने आणि साहाय्य मिळवून देणे, उपक्रमांचे आयोजन करणे, चर्चासत्रे व परिषदांचे आयोजन करणे, तक्रारी निवारण करणे इत्यादी कार्ये ह्या संघटना पार पाडीत असतात. अशा काही निवडक महिला उद्योजक संघटना पुढीलप्रमाणे आहेत-

1) NAYE चा महिला उद्योजक विभाग
The National Alliance of Youth Enterpreneurs
2) Indian Council of Women Entrepreneures
3) Federation of Indian Chember of Commerce and Industries (FICCI)
4) National Commission on Self Employeed Women in the Informal Sector
5) World Association of Women Entrepreneurs (WAWE)
6) Associated Country Women of the World (ACWW)

या व्यतिरीक्त महिला आर्थिक विकास महामंडळ व महिला नागरी सहकारी बॅंका याद्वारे प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे तसेच गरजू निराधार महिलांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने महिला बॅंक स्थापन करून त्यांना सहकार्य करण्याचा प्रयत्न प्रथमच महाराष्ट्रात करण्यात आलेला आहे. महिला उद्योजिकांना सहकार्य करण्याकरिता या विकास महामंडळ व नागरी सहकारी बॅंक जरी कार्य करीत असल्या तरी महिलांना उद्योजिकांच्या भूमिकेत कार्य करतांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते.

**महिला उद्योजकांच्या अडचणीः**

ज्याप्रमाणे महिलांमध्ये उपजतच गुण व क्षमता असतात त्याचप्रमाणे यासोबत काही जबाबदाऱ्या त्यांना पार पाडाव्या लागतात. ह्या जबाबदाऱ्या बरेचदा महिला उद्योजक विकासातील अडचणी सुद्धा बनतात. त्या पुढीलप्रमाणे असू शकतात-

१) कौटुंबिक जबाबदाऱ्या,

२) स्थलांतरावर मर्यादा,

३) सामाजिक प्रवृत्तीची वस्तूस्थिती,

४) जोखीम पत्करण्याची क्षमता मर्यादित,

५) भांडवलाचा अभाव-हमी शिवाय कर्ज प्राप्त होणाऱ्या अडचणी,

६) पुरूष मालकीच्या उद्योगाशी स्पर्धा,

७) हळवा व संकोची स्वभाव,

८) कायद्याची किचकट चौकट (कायद्याचे अज्ञान)

काही महिला उद्योजकांच्या ह्या अडचणी असू शकतात. परंतु या अडचणींवर मात करून यशाची शिखरे गाठण्याचे धाडस मनाशी बांधणाऱ्या महिला उद्योजिका आपणास पाहावयास मिळतात. या महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देवून त्यांच्या विकासात सरकारच्या योजना मदत करू शकतात. याद्वारे महिला उद्योजिकांची संख्या दिवसेंदिवस वाढण्यास सहकार्य होणार.

**निष्कर्षः**

महिलांनी ज्याप्रमाणे घर यशस्वीपणे सांभाळण्याची जबाबदारी पार पाडली त्याचप्रमाणे उद्योग व्यवसाय क्षेत्रातही त्यांनी यशस्वी महिला उद्योजकाची जबाबदारी पार पाडली. यशस्वीतेचा हा वेग जरी मंद व संथ असला तरी हळूहळू का होईना समाजातील संकल्पना बदलत आहेत. व्यवसायाभिमूख अभ्यासाकडे मुलींचा ओढा वाढत आहे. ही एक समाधानकारक बाब आहे. उद्योगात स्त्रीचा समावेश हा उन्नतीकडे नेणारा असणार उद्योगाचा विकास हा देशाची अर्थव्यवस्था सक्षम बनविण्याकरिता हातभार लावणारा असणार हे नक्कीच. छोटया-छोटया उद्योगातून रोजगार मिळवून देणे हे भरभराटीचे लक्षण आहे. स्वतःची भरभराटी व देशाची भरभराटी सुद्धा.

***संदर्भ ग्रंथः***


*१) उद्योजक- गृहिणी ते उद्योगलक्ष्मीची बिकट वाट, सप्टेंबर-२०१८,*

*२) महिला उद्योजकांना प्रोत्साहन गरजेचे महिलांसाठी प्रेरणादायी असा प्रवास*

*३) वाणिज्य कोश, खंड-२, प्रा. डॉ. संजय कप्तान, प्रा. जॉन्सन बोर्जेस, डायमंड पब्लिकेशन*

*४) www.womenentrepreneurs.com*